म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. ६२९

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.

REFBK-0006042
REFBK-0006042

: बी. जी. राहूरकर यांच्या स्मरणार्थ
संस्थेस भेट.
डिसेंबर १९८०

काव्य ११८६
डिसेंबर १९८०

७५३

आत्माराम रावजी देशपांडे

# भ ग्न मू र्ति

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ६४२
शाखा (स्थळ प्रत)

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रंथ क्र. ........

REFBK-0006042
REFBK-0006042

सिंधु प्रकाशन

सिंधु प्रकाशन
खांडवा आणि नागपूर
२ मे १९४०

सर्वाधिकार लेखकाधीन

अनुक्रम

मग्नमूर्ति. अर्पण.
—परिशिष्टें—
मुक्तछंदाचें वाचन. मुक्तछंदच कां म्हणून ?
काव्याचें नवयुग कसें येईल ? आधुनिक
खंडकाव्य. टिपणें. आभार.

मूल्य दीड रुपया

मुद्रक व प्रकाशक
नारायण लक्ष्मण प्रयागी
सुबोधसिंधु प्रेस, खांडवा

—भग्नमूर्ति

दा. क्र. ६८७२



भग्नवैभव

भग्नमूर्ति — ! आणि भग्नमंदिर
समोरच आहे तिचें पडकें
अवघे चारच पाषाणस्तंभ

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं. ३१०५ 
डिसेंबर १९५०
५८१३

आहेत उभे
साक्ष द्यावया गतवैभवाचा !!

भव्य प्राकार उंच गोपुर
सोनेरी कळस——कांहीच नाही !
पाडिलें, पडून उध्वस्त झालें
वाहून गेलें कालप्रवाहांत
कोठे नाही त्याचा मागमूसहि.

आज दिसती जे चार स्तंभ हे
विखरले होते आजूबाजूंना
मेळवून त्यांना यत्नेंसायासें
पाहून तेथील जीर्ण अवशेष
त्यावर आहेत उभे केलेले
आहे त्या स्थितींत सांभाळिलेले
कसें बसें वर छत देऊनी.

आता चला थोडें जवळ जरा

निरखून पहा सूक्ष्मपणाने
एकेक आहे हा पाषाणस्तंभ
तुमच्या कलेचें एक स्मारक !
— कसें म्हणूं पण तया स्मारक ?
तुमची अनास्था पाहून वाटे
योग्य म्हणणें हळहळून
तुमच्या कलेची जिवंत समाधि !

कारागिरीच्या ह्या पाषाणावरी
अरे आहे रे बुरा चढला, माजला शेवाळ !
आणि त्यांतच !!
संभावित जे पातले येथे
सहल कराया, वनभोजना,
देवदर्शना, यात्रानिमित्तें
कोरूनी ठेविलीं आहेत त्यांनी आपुलीं नांवें !
— धन्य तयांची !
खासच राहील जगांत नांव
कलाविध्वंसक नृशंसांचें त्या !

आहेत काढीत कोने कोपरे
उपद्रवी लोक छिलून कोणी
म्हणती आहे हा रक्तपाषाण
उपयोगी फार —
याच्या चूर्णाने उजळा येतो चांदीसोन्याला !
म्हणवितां ना रे तुम्ही वारस
मिरासदार त्या भव्य संस्कृतीचे आणि कलेचे
जिचे आहेत हे भग्न अवशेष ?
ज्याने फिरवून जादूचा हात
ओबडधोबड पाषाणावरी
रम्य आकृती कोरून काढिल्या
अनामिक तो अज्ञात शिल्पी
तुमचाच ना पूर्वज होता ?

किती कौशल्याने आहे कोरिला
स्तंभावर ह्या कमल–बंध
एकेक कोरून कोमळ दळ
उठवून दिलें सहस्रदळ

मराठी ग्रंथ सं...
स्थळ प्रत
काव्य
८८१३



नाजूक गुंफण पाकळ्यांची आणि
खोदिली आहे चाऱ्ही बाजूंना

कमळ–कल्पना–विकास सारा
निरनिराळ्या आकृतींमध्ये
सुरम्य चित्रण !
वापरला आहे पाषाणच हा
समजून हस्तिदंत तयाला
अथवा शिसवी लाकूड जणूं !

अनामिक त्या कलावंताने
आपलं नाही ठेविलें नांव
होतो तरी त्याचा मनीं आठव
कल्पनेंत उभी राहते मूर्ति !

येथेच कोठे तरुतळाशीं
बसून त्याने अतिकष्टाने
घडविला हा असे पाषाण
मनांत कल्पून पूर्ण स्वरूप
हळूहळू त्याला आकार दिला
आणि शेवटीं नाजूक घाव

हलक्या हातें टाकीने दिले,
अशी पुरी केली रम्य कलाकृति
खपला असेल कित्येक मास !

उभारिलें जें मंदिर त्याने
त्यांतला आहे हा थोडासा भाग
आणखी येथे जोत्यावरती
कोरिल्या होत्या आकृती किती—
किन्नर, गंधर्व, न्हस्त्रबाहुक --
झालर लाविली होती मूर्तींची·
अशा या सुंदर स्थलावरती
कलापूर्ण शिल्पकाम केलेलं
बांधून त्याने भव्य मंदिर
आंत स्थापिली सुरम्य मूर्ति
परमावधीच त्याच्या कलेची !

हर हर !! तीच पहा पुढती
छिन्नविच्छिन्न भग्न, खंडित



उभी करूनी आहे ठेविली
उघड्यावरी उन्हापावसांत !
आणि तुमच्या अनास्थेने ती
आणखी खंडित होतच आहे !!

अरे ! ज्या अज्ञात कलावंतांनी
रात्रंदिन अव्याहत खपूनी
तुमच्या उज्ज्वल संस्कृतीलागीं
लेणें दिलें होतें बहुमोल हें
असतील त्यांच्या अस्थिहि जरी
कण-कण कोठें अंबाळ्यामध्ये
त्याहि असतील सळसळल्या
उद्वेगाने, जेव्हा येथे जाहला
विध्वंस त्यांच्या कलाकृतींचा !

अमोल त्यांचें हें संस्कृति–दान
दिलें होतें त्यांनी सांभाळावया
आगामी पिढीला.

कलाकृती बद्दल अभिमान

फेडायाचें होतें त्यांचें तें दान, ऋण समजून,
त्यांच्यापासूनच स्फूर्ति घेऊन.
दुर्दैवानें त्यांच्या आणि आपुल्या
कांहीच न झालें असें यांतलें
पूर्वजांनी नाही सांभाळ केला
जाहला उच्छेद त्यांच्याच वेळीं
आणि आता काय ?
आपुलें तर पुरतें वाजलें आहे दिवाळें !
ऋण फेडायाची गोष्ट कशाला ?
नका करूं वर अवमानहि
इतुकीच आहे त्यांची अपेक्षा
अनामिक त्या कलावंतांची !

कधीचाच झाला भाग्यरवि–अस्त !
पश्चिमसागरीं मारिली त्याने
कधीची बुडी !
पण तेव्हा जे उडाले कांही
तेज–जल–कण वर आकाशीं

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
क्र. ५११२८
ता. १९।५।७०
ठाणे.

विखुरलेल्या तारकापरी, ते
अजून आहेत प्रकाशलेले.
साठलें आहे थोडेंसें तेज त्यांच्यांत तेंच.
तेंच आहेत हे भग्न अवशेष
भारतभूवर पसरलेले
जपा तयांना, चिंतन करा
त्यांच्या त्या अंधुक प्रकाशांतच—
कारण आहे थोडा अवकाश
अजून उषःकाल होण्याला !

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ७०९३

आणि आता ह्या रामगिरीवर
जात आहे अस्ता आजचा सूर्य !
सूर्यनारायणा !
विश्वाच्या सर्वदर्शी लोचना !
खासच आहेस पाहिला तुवां
आरंभापासून जगविकास.
येथे ह्या सिंदुरगिरीभंवतीं
नांदलीं राज्यें वाकाटकांचीं

पाहिली आहेस पूर्ण वैभवांत
आहे ज्या कालचें वास्तुशिल्प हें.

तेजोभास्करा !
तुझ्या मावळत्या करस्पर्शाचा
वरदहस्त ठेविशील का
माझ्या शिरावरी ?
क्षणभर तरी— एकच क्षण--
दिव्यदृष्टीने दाखविशील
वैभवाचा त्या परमोत्कर्ष ?
घेतले लोचन मिटून पाहा
विषण्ण मनें ध्यानमग्न मी
जुळवीत तींच कल्पनाचित्रें बसलों आहे !

उघडतां आता पुन्हा लोचन
झालेलें दिसे सारेंच सोनें
राम–लक्ष्मण–मंदिरांचीं त्या
शिखरें सारींच सोन्याचीं झालीं

—भोंसलेमहाल, बाराद्वारीच्या छत्रीचा घुमट—
सारा रामगिरी हेमाद्रि झाला
चमकती जणूं स्वर्णकणच
साऱ्या दिशांना !
संध्याकाळ ओती सुवर्ण रंग
भिजून निघाले त्यांतच सारें
सोन्याचा मुलामा जणूं बसला !

भग्नमंदिराचें आणि ह्या छत,
त्याच्यावर जें वाढलें आहे
पिवळें, वाळलें कोळ गवत,
तेंहि स्वर्णरंगीं चमकूं लागे !
चमक जणूं ही पूर्ववैभवाची
अस्ताला जातांना दाखवी रवि !

भग्नमूर्तीवर पाहा आतां वाटे
केली किमयाच !
तिच्यावर तेज पसरूं लागे संध्यारागाचें.



पूर्णस्वरूपाचें मनश्चक्षूंस

१४

सूक्ष्म कौशल्य दिसूं लागलें,
विलसूं लागलें छिन्न मुखावर
मंद गूढ हासूं चिरशांतीचें
अभय देत चराचराला !

देखा ! आहे ही वामनमूर्ति
पंचमावतार भगवंताचा !
अखंड कोरिली रक्तपाषाणीं
पूर्ण आकृति नऊ तालांची
रौद्ररसाच्या मुशींतच जणूं ओतिली आहे
शिखेपासून नखांपर्यंत
लिहिलें जणूं पाषाणांतच
ओजस्वी काव्य वीररसाचें !
ठाणमाण आहे कसें मांडिलें
उभें राहण्याची पाहा ती ऐट
निःशंक धीट, अतिभंगांत.
पीळदार सप्रमाण शरीर
वज्रदेही महायोद्धयाचें जसें

भरीव, सुंदर आणि रेखीव.
उरुमाळ रुळे मांडीवरती
कटीस बांधिली मुंज–मेखला
छाती रुंद ती सिंहासारखी,
विशाल स्कंध
उगम जेथे अष्टभुजांचा विक्रमशाली,
जणूं निघाल्या महावृक्षाच्या, बुंध्यामधुनी
विस्तीर्ण शाखा अष्टदिशांना !
वर उचलून उजवा पाय
स्थापिला आहे भार देऊन
बळीराण्याच्या मस्तकावरी,
दडपीत आहे त्याला पाताळांत.
दानशूर आणि महाबली तो
बलिराज पहा वाकत आहे
प्रचंड भाराने शिरावरच्या.
निर्विकार परि निश्चल मुद्रा
सत्वपालनाचा शांत आनंद
अढळ तीवर त्रिलसताहे !

उत्तमांग आणि प्रभामंडळ
मुखच्छवि तैसी प्रभावशाली
पाहा वामनाची !
अद्भुत तीवर भावमिश्रण
शांत–विक्रांताचें.
आकृष्ट भिवया, विशाल भाल,
विस्फारित तेजें दिव्यलोचन,
स्फुरित नासिका, कंपित ओष्ठ.
ऐसें हें दर्शन त्रैलोक्यव्यापी
अद्भुतवामन महाविक्रम त्रिविक्रमाचें !

असाल थोडेसे मूर्तिकलाज्ञानी
कलेचें कौशल्य ओळखणारे
तर पाहून रेषासंगति
छिन्नविच्छिन्न ह्या मूर्तीमधली
उभे राहतील अश्रु लोचनीं !
पाहा, कशी ही एकेक रेषा,
वादी संवादी, स्थायी, आरोही



अवरोही स्वरविलास जणूं,
आलाप घेत द्रुतलयींत
आळवीत आहे भैरवराग रुद्रतालांत !!

देवाधिदेवा !
खंडित मूर्तींत आता कोठलें
अधिष्ठान आहे भगवंताचें
भाविकजना !
पळाले पाहा पुजारी सारे
पोटार्थी बिचारे !
नवस सायास करणारे स्वार्थी भक्तजनहि—
आता मी नास्तिक बांधांत आहे
पूजा तुम्हां माझ्या मनोभावांची
उचंबळलेल्या हृद्भावनांची
कलेंत जो आहे अमर प्राण
आणि विकास मानवतेचा
त्यासच मानितों अधिष्ठान मी भगवंताचें
जनतारूपी जनार्दनाचें !

आणखी माझ्या ह्या भावपूजेंत
निसर्ग करीत मज संगत !
सायं–आरती देवा तुमची
रविराज हा करीत आहे
ओवाळीत आहे आपुल्या करें
संध्यातेजाचीं निरांजनेंच
डोलवीत आहे मंदानिल हा
छत्रचामरें तुमच्या शिरीं
नवविकसित तरुशाखांच्या किसलयांचीं
मोहर सुगंधी वसंतांतला
उडी घेत आहे चरणतळीं
सळसळ चाले शुष्कपर्णांची
आरती म्हणत.
अनाहतनाद चौघडा झडे हृदयांतरीं !!
—संपली पूजा
शांत स्तब्ध आता जाहलें सारें
हळूहळू तम पसरूं लागे
आणि उद्वेग माझ्या मनांत

उठवीत आहे दुःखदायक
सुखस्मृतींचीं वटवाघुळें,
प्रखर प्रकाशीं प्रत्यक्षाच्या जीं
उलटीं तोंडें करून होतीं
गाढ निजलीं
आता सपसप आवाज करीत
आहेत उडत कल्पनाव्योमीं !

दा. क्र. 6042

हाय ! माझ्या ह्या मातृभूमींत
जिकडे जावें तिकडे दिसे
उच्छेदच सारा कलाकृतींचा
भग्नमूर्ती आणि भग्नमंदिरें
लहान मोठीं.
जितुकी विपुल होती निर्मिति
तितुक्या असंख्य विध्वंसकृती.
नामनिर्देशहि अशक्य त्यांचा !

अजिंठ्याचे पहा विहार, चैत्य



२२

ठाणें.

अनुपम असें भितिचित्रण.
भंग पात्रे तेथे बुद्धसमाधि
उडाले पोपडे चित्राचित्रांचे
नाही जाणिली जगाची हानि
विध्वंस तेथे जयांनी केला !
प्रियकराचा गळ्यांत हात
असतां तेथे त्याची ती प्रिया
एका डोळ्याने दावीत विश्वस्त कोमल भाव
दुसऱ्या डोळ्यांत पाहा म्हणते
विनाश माझा !!

वेरूळचें आणि कैलासमंदिर,
कैलासच जणूं वास्तुशिल्पाचा,
वाटे जें संपूर्ण सोडिलें आहे
आकाशांतूनच !
तेथे तर केला कहरच सारा
विध्वंसकांनी
जणूं उन्मादेंच मूर्तिभंगाच्या



फोडतोड आणि जाळपोळहि
गजराजांच्या तुटल्या शुंडा
आणि नाकडोळे मूर्तिमूर्तींचे !

तीच गति आहे भाजें-कार्ल्याच्या
सुंदर लेण्यांची .....





२६

प्रचंड प्रस्तरीं कोरिल्या मूर्ती
घारापुरीच्या—
शिवतांडव, पार्वतीविवाह, देवदेवता—
हृदयद्रावक तेथे विनाश.
प्रलयकर्त्या महादेवाच्या
हस्तापादांचाच तांडवनृत्यीं लय झालेला,
तुटले हातहि पाणिग्रहणीं !

उत्तर प्रदेशीं आणि वरतीं
उपसर्ग जेथे फार पोंचला विध्वंसकांचा
एकहि राहिली नाही कलाकृति
तेथे अभंग !

जगद्विख्यात सांची स्तूपाचीं
ध्वस्त तोरणें !
आणखी पाहा त्यांच्या जवळच
देवांच्या प्रिय प्रियदर्शीचा
महाचक्रवर्ती धर्मपालाचा



राजा अशोकाचा सिंहस्तंभहि
उन्मळून पडे !
त्याचेहि झाले तीन तुकडे !!

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........
ठाणे.

आणि जीं आहेत आता स्थापिलीं
मोठाल्या शहरीं संग्रहालयें
एखाद्यास तरी त्यांतल्या द्यावी
ओझरती भेट
भरगच्च त्यांचीं मोठीं दालनें
भरलीं आहेत भग्नमूर्तींनी !

मथुरेच्या आर्षसंग्रहालयीं
शिरतांक्षणींच महाद्वाराने
कुशानसम्राट कनिष्काचा पाहा
भव्य पुतळा,
कोरिली ज्यावर ब्राह्मी लिपींत
बिरुदावली
'महाराजा राजातिराजा देवपुत्रो कानिष्को'
त्याचें आहे मात्र धड राहिलें
शिरच्छेद झाला कोणा दुष्टाच्या
ध्वंसक हस्तें !



आणि आपुल्या पूज्य क्षेत्रांत
आठवण पुरे नुसत्या एका
वाराणसीची — !

जवळच आहे सारनाथहि
जेथे बुद्धाने
प्रथमोपदेश धर्माचा केला
प्रवर्तित केलें धर्मचक्राला
तेथे कलाहिंसा हासत आहे
अहिंसातत्त्वा !
तथागत देखे मिटल्या नेत्रें
विपरीत हें अनपेक्षित विधिलिखित !!

केवढ्या विशाल कलाकृती ह्या,
निर्मात्री संस्कृति त्यांच्या मागली
जिचें होत्या त्या चैतन्य, प्राण,
पडल्या येथे ध्वस्त होऊन !



३२

संस्कृतिच देते जन्म कलेला
चैतन्य, विलास तिचाच असे
कला आणि विद्या,
जणूं मोहरच वृक्षावरला !
आणखी असंख्य फुलांतच त्या
सूक्ष्म आहेत बीजें साठलीं
ज्यांतून होणार नवनिर्मिति
पुढे संस्कृतीची.

ह्यास्तव संस्कृति कला, विद्यांचें
पोषण करी आणि रक्षण
ओळखली जाते पुढे संस्कृति त्यांच्यायोगेंच
अस्तित्व तिचें त्यांच्यावरच.

आणि आपुली पाहा ही कला
आहे बरें सारी अनामिकच
नाही एखाद्या विशिष्ट वा ज्ञात कारागिराची
कलावंताची.

कोठेहि नाही नांव कोरिलें कलावंताचें
ज्याची होती ती कलानिर्मिति !
इतुका होता तो जनतेचाच
समरस तिच्या जीवनाशींच.
आणि आता त्याच्या कलाकृतींत
सारी जनताच जिवंत आहे
तिच्या भावना, तिची संस्कृति !

कविकुलगुरु पुण्यस्मरण
कालिदासाहे
ज्याने केला वास कांही काळ ह्या
' जनकतनयास्नानपुण्योदक '
रामगिरीवर
त्याने तरी काय ठेविलें जगीं
नुसतें नांवच ' कालिदास ' हें
लोपून गेलें व्यक्तित्व त्यांचेंहि
समष्टींतच !
पण चिरंतन काव्यकृतींत

जीव धरूनी त्याच्या राहिली
गतसंस्कृति !

आताहि पाहा ह्या रामगिरीवर
आषाढीं कुटज फुलून येतो
वाहिलीं ज्याचीं फुलें यक्षाने
मेघराजाला !
पाहिल्या होत्या ज्या कालिदासाने
त्याच तारकांनी आकाश खुले
झुळझुळे वायु तसा सुगंधी
निसर्ग तसाच सतत आहे
तसाच होता तो जेव्हा जाहली
कलानिर्मिति;
तसाच होता जेव्हा जाहला
विध्वंस येथील कलाकृतींचा.

--संस्कृति-हासच मूळ कारण
सर्व नाशाचें !

किती नांदलें वैभव येथे !
रामगिरीची पाहा ह्या होते
वाकाटक नृप यात्रा करीत
द्वितीय प्रवरसेनाची माता
प्रभावती गुप्ता होती पूजीत
रामगिरिस्वामिपादांबुजाला
तेव्हा विलसली येथे राज्यश्री
आता झाला तिचा नाश सर्वस्वीं !

जवळ येथून ध्वस्त नगर
नंदपूर नामें ओळखती ज्या
पेंच नदीकाठीं विस्तार त्याचा
पसरला आहे योजनभर
दाट वाढलें अरण्य त्यावर
माजला आहे पालापाचोळा
त्यांतून काढावा लागतो मार्ग
जीर्ण अवशेष पाहावयाला
मोठमोठाल्या विटांचे पाहा

ढिगारे पडले चाऱ्ही बाजूंना
येथे हा पाया राजवाड्याचा,
नगरकोटहि उध्वस्त तेथे
संपूर्ण नगर उध्वस्त झालें !
जेथे नांदले नृपाल भूप
तेथे फिरती शृगाल घूक !!
दोन्ही बाजूंचे अभेद्य दुर्ग,
आहेत अजून पर्वतावरी
खिन्नपणें टकमक पाहत
म्हणत आहेत
' राजधानी ही वाकाटकांची
' धुळीस मिळाली त्यांच्या सर्वेच
' पाहा कसा होतो संस्कृतिनाश ' !

—आणि कसा होतो संस्कृतिनाश
रहस्य जाणिलें पाहिजे हेंच
जगायचें आहे जगांत ज्यांना
स्वाभिमानाने स्वसंस्कृतीमधे

त्यांनी पाहिजे उलगडलें,
लाऊन घेऊन जीवा तळमळ
वाचिलें पाहिजे इतिहासाला !

इतिहास पाहा सांगत आहे
कसा झाला नाश राष्ट्राराष्ट्रांचा.
आधीं पोखरिली जाते संस्कृति
तिच्यांतील तेज नाहीसें होतें
लयाला जातें विचारसामर्थ्य
बनतात विद्या तात्त्विक केवळ
निरुपयोगी, चैतन्यहीन,
विसंगतच लोकजीवनाशीं
जीवनरसाशीं असमरस.
खुंटतसे प्रगमनशीलता
दाबले जातात नवविचार
शक्तींचाच त्या विसर पडे
ज्यांतून अखंड विकास होतो
राष्ट्रजीवनाचा.

हळूहळू मग नाहीसें होतें
सामर्थ्य देखील स्वरक्षणाचें,
उपेक्षिलें जातें सारेंच तंत्र
निजरक्षणाचें, संघशक्तीचें.

मूठभर मग रानटी लोक
असंस्कृत पण नव्या जोमाचे
चेतलेले साध्या तत्त्वज्ञानाने
उठतात आणि जिंकतात त्या
जीर्ण राष्ट्राला,
मोडतात त्याची मृतसंस्कृति !

अरे ! ओळखा बुद्धिसामर्थ्य
आणि महत्व स्वरक्षणाचें.
घाला दोहोंचीहि योग्य सांगड
नका उपेक्षूं ह्यांतल्या एका
तरच राहाल जगतांत ह्या
ना तरी मराल, व्हाल नामशेष !

सांगतो हेंच ओरडून तुम्हां
सृष्टिविकास !



येथे जगतांत नांदून गेले
पर्वतासारखे प्रचंड प्राणी
दैनासुर, भ्रांतासुर, स्त्रीजासुर,
अस्थ्यासुर आणि द्विप्लवोदक
— अजस्र सरडे —



मत्तदंत आणि मम्मथ नामें विराट हत्ती.
निर्मूलन झालें त्यांच्या जातींचें
उरले अजस्र सांगाडे मात्र
कुजल्या हाडांचे पृथ्वीच्या पोटीं !
होते सारे हे विशालकाय

आणि शक्तिमान
पण देखा त्यांचा मस्तिष्कभाग
फारच लहान, थोडासा होता
संवेदना होत्या साऱ्या दीर्घसूत्री
नव्हतीं आयुधें त्यांच्या शरिरा
स्वरक्षणाचीं, प्रतिकाराचीं
म्हणून तयांचा उच्छेद केला
आकारें लहान, पण चपळ,
बुद्धिमान अशा हिंस्र प्राण्यांनी !

निसर्गें घेतला ह्यांतून बोध
रचून असंख्य कोटी जीवद्रव
प्रचंड शरीरें निर्मिण्याचाच
त्याज्य उपक्रम सोडून दिला.
धरिला दुसरा उत्क्रांतिमार्ग
बुद्धिविकासाचा.

उत्क्रांति होतां ह्या दुसऱ्यापंथें

क्षुद्र मर्कटांस महत्व आलें
मनुजविकास तेथून झाला.
आणि मनुजाने बुद्धिसामर्थ्यें
बुद्धिसाहाय्यें, अल्पशक्तीने
जिंकिलें पाहा साऱ्या सृष्टीला
नमविलें मोठ्या प्राणीमात्रांना
निसर्गासहि घातला पाहा पायबंदच !
आणखी वाढल्या बुद्धिसामर्थ्यें
लढतच आहे अप्रतिहत
मनुजविरोधी सर्व शक्तींशीं !

विचारांत दिसे बुद्धिसामर्थ्य !
जाणा विचाराची प्रबळ शक्ति
विचारें आणिक तत्त्वज्ञानाने
अखिल मानवजाति हालते
कंप पावते, स्फुरण घेते
उद्युक्त होते, प्रोत्साहनाने महत्कार्याला
अशक्य वाटतें तेंहि दाविते

करून शक्य !
इतुकी प्रचंड प्रेरक शक्ति
विचारांत आणि तत्त्वज्ञानांत !

असंख्य दृष्टांत आहेत ह्याचे
आठवा त्यांतले एकदोनच
धर्मक्षेत्रांत कुरुक्षेत्राच्या
कुरुयुद्धाच्या आरंभवेळीं
हतबुद्ध झाला अर्जुन वीर
दुबळ्या विचारें लोपलें त्याचें
अवसान आणि उत्साह, तेज
प्रज्ञाहतांची नेभळीं तत्त्वें
बोलूं लागला !
तेव्हा प्रेरिलें भगवंताने
तेजस्वी विचारें आणि तत्त्वज्ञानें
गीता-उपदेश कर्मयोगाचा
तयाला केला.
उत्साहें उठला अर्जुन योद्धा

चेतलेला त्या तत्त्वज्ञानाने
मिळविता झाला महाविजय !

आणि समर्थें रामदासाने
शिवरायाने छत्रपतीने
जागृत केलें महाराष्ट्राला.
कसें ऐकितां समर्थ बोल
मराठ्यांना आलें शौर्य सामर्थ्य !
'अरे वह्नि तो चेतवावारे
'चेताविताच चेततो' असें
निघतां वचन रामदासाचें
चेतलाच देखा स्वांतत्र्यवह्नि
महाराष्ट्रभर !
दीन दुबळा जरी मावळा
हरहर महादेव गर्जेला !

बुद्धि भ्रष्ट होतां तसेंच पाहा
कसें फिकें पडे सामर्थ्यतेज

दुबळून जाते प्रचंड शक्ति !
कित्येक युद्धांच्या रणक्षेत्रांत
विजयश्री माळ घालीत होती
आपुल्या राजांच्या शूर सैन्याला
पण इतुक्यांत उठावी हूल
मेला, मारला राज्यनायक
एकाकी व्हावें सैन्य बेदिल
पळावें फुटेल वाट तिकडे
धैर्यहत शत्रूलागीं मिळावा
फुकट जय !
विनाश आणखी राज्याचा व्हावा !

पराजय असे कितीक झाले
अशा चुकल्या तत्त्वज्ञानेंच !
जेथे नांदले हेच विचार
राज्य राजाचें, देश राजाचा
त्याचेंच सैन्य, त्याच्यासाठीच युद्धें लढाया
तेथे मरतां राजा नुरतें

प्रयोजन लढण्याचें सैन्याला !
मावळतो सारा उत्साह त्यांचा !

आणि पाहा ह्याच्या उलट स्थिति
जेव्हा जाणीव जिवंत होती
सारा महाराष्ट्र मराठ्यांचाच
सारेच मालक दौलतीचे त्या
तेव्हा नसतां ठावठिकाण
राजारामाचा,
लढला मराठा एका दिलाने
रक्षिलें स्वातंत्र्य महाराष्ट्राचें.

—तत्त्वातत्त्वांचे खेळ हे सारे !

तसेंच पाहा हें दुसरें तत्त्व—
‘ क्षत्रियें केवळ युद्ध करावें
‘ ब्राह्मणें नुसते मंत्र जपावे
‘ वैश्याने करावा व्यापार आणि शूद्राने सेवा’.

सुखस्वास्थ्यांत संकटांत वा
सर्वांनी हाच धर्म पाळावा !
येतां परचक्रं अशा स्थितींत
कोण होणार तेथे सांगता —
अरे ! देशाला लागतां आग
कोण ब्राह्मण, कोण क्षत्रिय,
वैश्य, शूद्र वा
सारेच सैनिक मायभूमीचे
करा रक्षण देऊन प्राण !

— नवल कशाच विनाश झाला !!

विनाशकारक विचार असे
पराजयगामी तत्त्वज्ञानहि
सूक्ष्मबीजरूपें रुजल्या गेलें
आपल्या भूमींत.
आणि पुढतीं महावटवृक्ष तयांचा झाला
पसरीत मुळें चाऱ्ही बाजूंना

ता.
ठाणे.

सोडीत पारंब्या पुन्हा भूमींत
— असा वाढला विस्तार त्याचा —
संस्कृतिमंदिर घेरिलें त्याने
दगडी भिंतींत आणि पायांत
फोफावलीं मुळें !
जागोजाग किती पाडिल्या भेगा !
विस्कळीत झालें सारें मंदिर
शिखरापर्यंत उलून गेलें !!

महातत्त्ववेत्ते धर्मस्थापक
येथे पाहा किती होऊन गेले
महावीर, बुद्ध आणि आचार्य
— पूज्यपाद सारे निःशंक वंद्य —
कल्याणासाठीच झटले सारे
मानवजातीच्या आणि जगाच्या !

निर्घृण निसर्ग निष्ठुर काळ
सदोदित पण आहेत उभे

परीक्षा घ्याया साऱ्या तत्त्वांची
पाहा कशी त्यांच्या महातत्त्वांची
उडविली त्यांनी धूळदाणच !
सत्यजीवनाच्या कसोटीवर
कस उतरला त्यांचा कितीसा
पाहा नीट आता उघड्या डोळीं
उघड न्याय !!
दिसलें नाही जे तयां महात्म्यां
दाखवीत आहे तुम्हा तें काळ !

त्यांनी जो सद्धर्म उपदेशिला
जीवनविकास अभ्युदयाचा
समजून तो नुमजून वा
आचरीत आले श्रद्धाळुपणें
आपले पूर्वज
आशा धरूनी अभ्युदयाची !
तयांना आणि त्यांच्या वंशजां
घोर विनाशाचीं फळें मिळालीं

अहिंसकांच्याच जाहल्या हिंसा
आणि जे म्हणत इहलोकाला
‘ माया, मिथ्या, भास ’ धडपडले
त्यांच्या त्या आत्म्याच्या मुक्तीसाठीच
त्वरेंच दिसला स्वर्ग तयांना !
पडले सदाचे दास्यपंकांत
मेलेल्या मनें
ओंचवले इहवैभवालाहि

अरे ! तत्त्वज्ञान, धर्म, विचार
उदात्त किर्तीहि जरी असले
सूक्ष्म आणि दिव्य जरी वाटले
भासले, निघाले साक्षात् देवाच्या मुखांतूनच
तरीहि तयांना आचरूं नका,
समजूं नका, समजाऊं नका
अशा मार्गानें, अशा योगें कीं
जेणें याच जगीं, याच जीवनीं
याच देहीं आणि याच डोळ्यांनी

उत्कर्ष सर्वांचा तुम्हां न दिसे !
समजा तें तत्त्वज्ञान भ्रामक
मिथ्या जें मानितें इहजगाला
तुच्छ लेखितें मानवदेहा
आणि जीवनाला !
मानवविरोधी जे जे विचार
मूर्तिमंत नाश जाणा खास ते !

निसर्ग आहे नीतिनिरपेक्ष
धर्माधर्माच्या, पापापुण्याच्या
अगदी पल्याड, पलीकडेच.
कठोर दंडक आहेत त्याचे
सारखेच लागू चराचराला.
प्रकटतां त्याची विनाशशक्ति
धरणीकंपाच्या ध्वंसकरूपें
मंदिरें आणिक मदिरालयें
साधूची झोपडी, दुष्टांचे वाडे
मोडून टाकते एकाच वेळीं

एका तडाक्यांत !
मानवनिर्मित विधिनिषेध
उच्चनीच भेद धर्माधर्म ती
जाणे न कांही !
उठतां वादळ महासागरीं
बुडतां नौका, पोहणारा वाचे महापापीहि
भवाब्धितारक पुण्यसंचय
तेथे न येई कांही कामाला !

जाणा निसर्गाचें सत्यस्वरूप
प्रकटलेलें त्रिगुणात्मक
उत्पत्ति, स्थिति आणि लयाच्या
त्रिविध रूपें.
अफाट त्याची निर्माणशक्ति
उधळून देते अखंडपणें जगतावर
तरुलतांची, फळाफुलांची, जीवजन्तूंची,
प्रफुल्ल, समृद्ध, चैतन्यसृष्टि !
तसाच निसर्ग स्थितिरूपांत

शांत, शीतल, आल्हाददायी;
जगद्धात्री मायमाउली परी
पोशितो, रक्षितो आपुलीं बाळें
आपुल्या तंत्रें !
आणि धरूनी कृतान्तरूप
विक्राळ, क्रूर, प्रलयकारी
पंचमहाभूतें खवळून देतो.
विकट तांडव नृत्य नाचून
स्वेच्छ करितो नाश सृष्टीचा !

—सदैव त्याचा हा खेळ चालला
कालचक्राच्या फेराफेरांत !!

आणि अशा ह्या निसर्गांतच
जगणें आहे मानवप्राण्या
निसर्गानेच परिवेष्टित
जीवन त्याचें.
जीवनविकास त्यांतच त्याचा.

निसर्गातल्या सर्व शक्तींचा
पाहिजे त्याने विचार केला
कारण मानवी जीवन आहे
निसर्गाचाच एक घटक
—विचारी अंश !

सर्व शक्ती ह्या निसर्गातल्या
आहेत झालेल्या प्रतिबिंबित
मानवजीवनीं.
स्फूर्ति घेऊन निसर्गातल्या निर्मितींतून
मनुज निर्मितो कलाकृतींची सुंदर सृष्टि
—प्रतिकृति नव्हे प्रतिसृष्टीच— !
निसर्गातल्या सौंदर्यश्रीचा
आस्वाद घेऊन मनमुराद,
विश्वासून त्याच्या स्थितिस्वरूपीं
बांधितो आपुलीं भव्य स्मारकें !
आणि बळावतां मूळ स्वभाव
पाशवी, ध्वंसक युद्धतृष्णेचा

हत्याकांड, नाश जाळपोळहि,
करीत निघे,
मोडीत कृती मानवांच्याच
मनुजनाशास मनुज उठे !

निसर्गस्वभाव, निसर्गशक्ती,
निसर्गांत जें जें आहे तें सारें मानवांतहि
— आणखी अधिक त्याहून आहे —
निसर्गाची जी अंतिम सीमा
मनुजकार्याचा आरंभ तेथे.
तेथून विकास मानवतेचा.
तेथून पुढे जाण्यासाठींच धडपड त्याची.
तेंच उद्दिष्ट साधायासाठी
त्याची कला, शास्त्रें, विद्या, तत्त्वज्ञान
धर्म, आचार, विचार आणि नीतिनियम.

निसर्गाहूनी अधिक असें मनुजांत जें
त्यांतच आहे एकवटली

मनुष्यजातीच्या कल्याणाची आशा.
आणि ती आशा सफल व्हाया
इहलोकांत, याच जगांत,
झटलें पाहिजे नित्य मानवें
वेंचून आपलें शक्तिसर्वस्व.
निसर्गांतल्या धारकशक्ती
योजून कौशल्यें मनुजकार्यीं
नित्य पाहिजे झगडलें त्यानें
विरोधी, संहारी, नाशशक्तींशीं.

तोच सर्वश्रेष्ठ मानवधर्म
बनवितो जो मानवजाति
कार्यक्षम आणि प्रवृत्तिपर
मानवकल्याणीं नित्य उद्युक्त
सुखद कराया इहजीवन
उपदेश हाच देऊन तया
निसर्गशक्तींशीं स्वरसंगम
मनुजवृत्तीस कराया सांगे !

मानवी विचार, आचार, नीति,
तत्त्वज्ञान, विद्या आणि संस्कृति
मनुजनाशक मात्र होतात
विसरतात त्या जेव्हा निसर्गा
तुच्छ गणूनी इहजगाला !
निसर्गाचा आहे साधा नियम —
जाणती न जे त्याचें स्वरूप,
त्याने निर्मिल्या परिस्थितींत
तीस साजेसें राहती न जे
नित्य जागरूक निजरक्षणीं
झगडत आणि बदलत, ते
आज ना उद्यां जाणार नाश ! —
परलोकरत धर्म तयांचा
त्यांना इहलोकीं रक्षूं न शके !

पाहा निसर्गाशीं लढण्यांतच
त्याच्या विरोधास हटविण्यांत
जिंकण्यांत पंचमहाभूतांना

मानवी शक्तींचा विकास होतो,
लाभतें चैतन्यमय जीवन.
मानवहितार्थ त्याशीं लढतां
मरणांतहि जीवन लाभे
चिरंजीव होतें नाम तयांचें
नांदतो वैभवीं तयांचा वंश !

आतां तरी नीट उघडुनी डोळे
पाहतां दिसे फरक हाच
आम्हांत आणि त्यांच्यांत ज्यांनी
जिंकिलें आम्हां !
संस्कृतींत न्यून हेंच आमुच्या
आम्ही उपेक्षिलें इहजगाला
तुच्छ लेखिलें इहवैभवा
कर्मफलाचें कमनशिबी
तत्त्वज्ञान बाळगिलें उराशीं
पवाडे गात परलोकाचे !
निजरक्षणाचा भार घालून



ठाणे

दगडी देवदेवतांवरी स्वस्थ बसलों
इतुके जाहलों कर्मनिवृत्त
विचारभ्रष्ट !

अरे ! दगडांच्या देवमूर्तींत
देवत्व तुमच्यामुंळेच येतें
तुमच्याच भावनेचें तें तेज !
तुम्हींच पाहिजे रक्षण केलें तुमच्या देवांचें
देवावर जरी विश्वास आहे
श्रद्धा आणि निष्ठा
तितुकीच ठेवा आपल्यांतहि
कारण देखा देवांचें कार्य
तुमच्या हातेंच होणार आहे,
तुमच्या रक्षणीं त्यांचें रक्षण !

पाहा ! किती होतां रक्षणहीन !
निसर्गांतल्या संहारशक्ति
सुटतां हिंस्रमानवरूपें तुमच्यावरी

माराया तुम्हां, सर्वस्व तुमचें लुटून न्याया
बुभुक्षित, क्रूर मानवजाती
चालून येतां, निजलां स्वस्थ
हृदयीं घाव घालीपर्यंत,
करूं दिली त्यांना लांडगेतोड
रक्षिण्यास निज बांधवालागीं
नाहीं धावलां
निजरक्षणहि झालें अशक्य !

सोमनाथाच्या देवळालागीं
पुजारी होते सहस्र जरी
रक्षण होतें का समयोचित !
आवश्यकता न त्याची वाटली
कारण दगडी देव वाटला
समर्थ कराया निजरक्षण
आणिक त्याच्या भक्तजनांचें !
मूर्तिभंजकें फोडितां मूर्ति
दिसलें श्रद्धेचें फोल स्वरूप !

अजूनहि पाहा आहोंत किती रक्षणहीन —
ताजा इतिहास चार वर्षांचा
निजरक्षणाच्या उपेक्षेचाच !
प्रतापगडची भवानी आई
साऱ्या मराठ्यांची आदिमायच
स्वराज्यदायक, संकटहारी,
प्रार्थिली पूजिली शिवरायें जी
भेटीस जातांना अफ्जुलखानाच्या !
भूषविलें जीस बहुमोल रत्नें
आणि अलंकारें विजय होतां !
चोर लुटारू पाहा तेथले
अलंकार सारे लुटून नेती
हालवीती देवीचेंहि आसन
बेदम चोपून पुजारी लोकां !

पाहा ! तुमची सर्व संस्कृति
रक्षणतंत्राच्या उपेक्षेनेच
ढासळली आणि उध्वस्त झाली

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. क्र. काव्य ११०८
ता. १७५८०

मोडून टाकिली विध्वंसकांनी
आकुंचित निरर्थक मर्यादा
घालीत बसलां रिकामपणीं
वाढवीत नित्य भेदभावाला
जातीजातींच्या, पंथापंथांच्या
मोडून टाकीत ऐक्यभावना
संघशक्तीची.

पाहा ! स्वतःच्या रक्षणासाठी
वाढवावी लागे स्वत्वाची व्याप्ति
संस्कृतीच्या ऐक्यभावनेभोंतीं
मेळवून तिच्या सर्व बाळांना
स्वकीयं भावना प्रेरावी लागे
तयां सर्वांत.
मोडून क्षुल्लक, कृत्रिम, भेद
विस्तारावें लागे जीवनक्षेत्र,
सर्व देशाचें संवेदनामय
बनवावें लागे एक शरीर

एक हृदय !
आपुली संस्कृति, आपुली कला,
आपुलें ऐश्वर्य, आपुलें वित्त,
आपुलीं मंदिरें, आपुला देश
रक्षावयाला सदा सुसज्ज
जेव्हा राहतात सारेच लोक
ओळखून जीवनैक्य सर्वांचें--
तेव्हाच नांदतें शक्तिसामर्थ्य
स्वरक्षणाचें, प्रतिकाराचें.

आणि येथली भग्नमूर्ति ही
हेंच दाखवीत आहे सर्वांना
आपुल्या नाशरहस्याचें जणूं
प्रतीकच आहे छिन्नस्थितींत.
खंडित झालेल्या अष्टभुजा, पाहा,
दाखविती किती भेसूरपणें
तुटलेले होते आपले हात.
छिन्न शिरोभाग सांगतो कसा

झाला होता पूर्ण विचारभ्रंश !
विराटस्वरुपी राष्ट्रपुरुषाचे
हस्त आणि शिर
कसे नष्ट भ्रष्ट झालेले होते !

महाराष्ट्राच्या साधुसंतांनी
आहे आपणां उपदेशिला
साधासुधा धर्म भक्तिमार्गाचा.
आचरीत तो आजहि पाहा
हजारों यात्रिक येथे जमती
त्रिपुरीपौर्णिमा महोत्सवाला
प्रभु रामचंद्रदर्शनासाठी.
‘ रामरामराम राम सीताराम ’
असें आळवीत भक्तिभावाने
टाळमृदंगाच्या मंजुध्वनींत
पताका घेऊन प्रेमें नाचत
भजन करीत शेकडों दिंड्या
पायरीच्या वाटें चढत जाती



गडावरती ·
जर्जर म्हातारीं कोतारीं आणि लहान मुलें
कडेस घेऊनी तान्ह्या बाळांना
बाया बापड्या, चालती सवें,
पाहात शिखरें मंदिरांचीं त्या
गगनचुंबी, अद्भुत तेजें
चमकती जीं स्वच्छ चांदण्यांत·
चहूंबाजूंना एकच उठे
जयघोष नित्य रामनामाचा !
काय वर्णावा तेंव्हाचा थाट
मध्यरात्रींच्या आरतीवेळीं
त्रिपुर जळे पीतांबराचा·
उंच शिखरीं पेटती आरत्या सहस्रावधि
देहभान सारें हरपून जाई
सोहळ्यांत त्या
अपूर्व उत्साह चहूंबाजूंना !

आणि आता जसा दिसे उत्साह

तसाच नसेल काय तेव्हाहि
जेव्हा जाहला येथील मूर्तींचा
विध्वंस वा नाश ?
तेव्हाहि होताच भक्तिधर्म हा
तेव्हाहि जमत असतील खास
हजारों भाविक अशा उत्सवा !
मात्र रक्षणास देवमूर्तींच्या
असतील आले धाऊन किती
श्रद्धाळु भाविक भक्तांतले त्या ?
बहुतेक सारे आपल्या घरीं
असतील खास बसले म्हणत
सोडीत उसासे दीर्घ निःश्वास
' मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास ' !

अशी ही भक्ति !
जिच्यांत नाही सामर्थ्य, शक्ति
संरक्षणाचीहि निजदेवाच्या
खास नव्हती उपदेशिली

तुमच्या संतें !
' मरू मेणाहूनी आम्ही विष्णुदास
' कठीण वज्रास भेदूं ऐसे ' च
निघालें होतें संतवचन
जिच्या पोटीं नाही अशी शक्तीहि
भक्ति ती केवळ देखावा आहे
दांभिक, नेभळा वरकरणी !

असा झाला देखा नाश सर्वस्वी !
पण आता त्या नाशावरहि
पुन्हा बांधायास आशामंदिर
उठलें पाहिजे आपणच ना ?
जीवनकार्य तें आपुलेंच ना ?
गतशतकांच्या अनुभवांचा
ज्ञानविज्ञानाचा आणि आजच्या
अपूर्व संयोग झालेला जींत
अशा भाग्यशाली नव्या पिढींचें
नवचैतन्याचें जीवन पाहा

महाभाग्यें आपणांस लाभलें.
करूं कांही तरी त्याचें सार्थक !

आणि पाहा ह्या भव्यकलाकृती
ज्यांचे अवशेष आज पाहतों,
नित्य दाखवीती आपणां किती
प्रचंड कार्यें
येथे आपल्याच पूर्वजें केलीं !

पाहा ! आजहि राहतां उभें
कैलासमंदिर विलोकिण्याला
अभिमानें ऊर दाटून येतो
स्फुरण पावती आपले बाहु
त्यास साजेसें कांही कराया
आनंदाश्रु उभे राहती डोळां
पिऊन तेथलें कलासौंदर्य
श्रेष्ठत्वाची होय जाणीव आम्हा !
आणि त्या जिवंत जाणिवेंतच

नवजीवनाची पुनरुत्थानाची
प्रकटित होई प्रबळ आशा !

प्रखर उन्हाळा आता आहे जरी
तापली तयांत धरणीमाय
उलून जाय
दिसे रूक्ष आणि रखरखीत
जीवननिर्झर सारीकडचे आटून गेले
पेटती वणवे
ऊन वाऱ्याने सारी हिरवळ वाळून गेली
सुकेल वृक्ष
असा आहे जरी आज उन्हाळा
तरी पावसाळा दूर का आहे ?
देखा ! ह्या प्रचंड उन्हामधेच
भरलेली आहे विराटशक्ति
महासागरास तापविण्याची
पाहा त्याची किती वाफ होऊनी
भरली आहे नभोमंडळीं !

पुन्हा हीं आणिलीं तुला वाहाया
अर्धीं फुललीं, अर्धीं मिटलीं
कांहीं वाळलीं, गवती फुलें
—ओसाड भूमींचीं उघडीं बाळें
भग्नमंदिराच्या भेगांमधुनी
खचल्या जोत्याच्या निखळलेल्या दगडांकाठीं
कोठे कधींतरी विकसलेलीं—
असूं दे अशींच जशीं मीं दिलीं !

झालें पाहा आता विणून पुरें
शब्दजाल हें
संपला तंतु, आटले शब्द.

ओसरला आता भावनापूर
पुन्हा आली मना जडस्थिरता
उदासीनता कार्यपूर्तीची
जशी गानान्तीं गायकाला ये,
चित्रकारा ये चित्र संपवितां
—कांही तरी स्वर हृदयामधे
राहिले वाटून अपरिस्फुट—
—नाही प्रकटल्या नाजूक चित्रणीं
कांही रंगछटा, सूक्ष्म भावना—
जाणीव त्याची मना होऊन.

उदासीनता ती हृदयाशय
पुरता रिता न झाल्याने ये का?

जसा चित्रकार पाहतो कोऱ्या कागदावरी
कल्पिलें चित्र,
गायक सूक्ष्मश्रुतींत ऐकितो
गीतविस्तार,

मूर्तिकार देखे केवळ पाषाणीं मूर्ति कोंडलेली,
—उद्युक्त होई—
—रंग-रेखेंत बांधण्या त्या चित्रा—
—करण्यास श्रुति कंठगत त्या—
—पाषाणीं कोंडली मूर्ति सोडविण्या—
आणि संपतां त्याचें तें कार्य
जाणीव होउनी आपल्या अपुऱ्या कुशलतेची,
उपकरणांच्या स्थूलपणाची,
उद्विग्न होई आठवून ती मूळ प्रचीती,
—येथे कुंचलीचा मार वाढला
तेथे न साधलें रंगमिश्रण—
—तेव्हा न काढतां आले ते सूर—
—आणि चिपोरा किंचित् जास्तच येथे निघाला
—अशा विचारें.
उदासीन मीहि तसाच आता !

मनांत जो काव्याशय भावित
तितुका न खास उतरला ह्या

शब्दचित्रणीं.
राहिलें खचित कांही मनांत
मनासहि जे नाहीं कळलें
साठवितां नाही आले शब्दांत !

असो, परि ज्या पुढती माझें
कौशल्य येथे जाऊं न शके
तीच माझी सीमा जाणून मीहि
अशीच ही कृति सोडून देतों
पूर्ण म्हणून.

—अतृप्तपणें अपूर्णच पण तुज अर्पितों !

## १. मुक्तछंदाचें वाचन.

ह्या काव्याची रचना छांदस मुक्तछंदांत केलेली आहे. अक्षरछंद एका चरणांत ठराविक अक्षरसंख्या योजिल्याने सिद्ध होतो. त्यास मात्रांचे वा गणांचें नियोजित बंधन नसतें.

हा मुक्तछंद अक्षरछंद असल्यामुळे तो वाचण्याची पद्धत ओवी, अभंग आणि इतर अक्षरछंद वाचण्याच्या पद्धतीसारखीच आहे. प्रत्येक ऱ्हस्व वा दीर्घ अक्षराचा उच्चार दीर्घ अक्षरासारखा दोन मात्रांच्या कालावधींत करावयाचा असतो. ह्यामुळे अक्षरछंदास 'लगत्वार्तात' असें म्हटलें गेलें आहे.

ह्या मुक्तछंदाची उभारणी पांच अक्षराचा व सहा अक्षराचा असे दोन चरणक योजून केलेली आहे. एका चरणांत (ओळींत) हे चरणक वाटेल तितके व वाटेल त्या क्रमाने योजितां येतात. पांच अक्षराचा एकच किंवा सहा अक्षरांचा एकच चरणक योजून अथवा इच्छेनुसार त्यांची जुळणी करून एक ओळ तयार होते. एका कडव्यांत, विभागांत वा स्तंभांत कितीहि ओळी योजितां येतात.

चरणकांप्रमाणे ओळीचें छेदन असें :—

भंग्नमूर्ति आणि । भंग्नमंदिर
समोरच आहे । तिचें पडकें
अवघे चारच । पाषाणस्तंभ
आहेत उभे ।
साक्ष द्यावया । गतवैभवाची

ह्यांतील प्रत्येक अक्षराचा उच्चार अक्षरछंदाच्या

पद्धतीप्रमाणे दीर्घ करीत व प्रत्येक चरणकाच्या आद्य अक्षरावर सूक्ष्म आघात वा किंचित् वजन देत आणि चरणकाच्या अंतीं अत्यल्प विराम घेत हा मुक्तछंद वाचावयाचा आहे. ज्या अक्षरावर सूक्ष्म आघात वा वजन द्यावयाचें आहे त्या अक्षरावर वरील छेदनांत उभी रेघ दिलेली आहे व टाळी त्या अक्षरावर पडते. हा आघात वा वजन इंग्रजी 'ॲक्सेंट्' प्रमाणे सूक्ष्मपणें द्यावयास पाहिजे. स्थूलपणें दिल्यास वाचन चमत्कारिक होईल.

साधारणतः मुक्तछंद वाचण्याची पद्धत अभंगादि अक्षरछंद वाचण्याच्या (स्वरांत गाण्याच्या नव्हे) पद्धतीसारखीच आहे.

## २. मुक्तछंदच कां म्हणून ?

ह्या काव्याची रचना मुक्तछंदांतच कां केली आहे ह्या प्रश्नाचें विवेचन करण्यापूर्वी मुक्तछंदासंबंधी जे गैरसमज पसरले आहेत त्याविषयीं थोडेंसें लिहिणें योग्य होईल. खरोखर पाहिलें असतां मुक्तछंद हा इतका साधा, सुकर आणि मराठी छंदाच्या परंपरेला धरून आहे कीं त्यास परंपरेच्या परिचितांकडून मुळींच विरोध व्हावयास नको.

तालबद्धता हेंच छंदाचें अंतिम लक्षण हा सिद्धांत आता कोणांस अमान्य होईल असें वाटत नाही. ह्या सिद्धांतापलीकडेहि जाता येण्यासारखें

आहे आणि आंदोलन हेंच छंदाचें अंतिम लक्षण असें प्रतिपादन करतां येणें शक्य आहे. परंतु आंदोलन जी छंदता सूक्ष्मपणें दाखवितें तीच स्थूलपणें ताल दाखवितो. तेव्हा आंदोलन व ताल ह्यांच्या शास्त्रीय विवेचनांत न शिरतां ताल हेंच छंदलक्षण हा सिद्धांत पुरेसा उपयोगी असें धरून चालण्यास प्रत्यवाय नाही.

मुक्तछंद तालाची आवश्यकता मानीत नाही हा निष्कारण गैरसमज आहे. छंदास तालाचें बंधन आवश्यक नाही ही मुक्तछंदाची भूमिका नाही; कधींहि नव्हती. तालबद्ध अक्षररचना म्हणजेच छंद ही छंदाची व्याख्या पूर्णपणं मान्य करूनच हा मुक्तछंदाचा प्रयोग केला गेला आहे. हा प्रयोग करणारांना तालाच्या काव्यांतील कार्याची पूर्ण ओळखहि आहे. मुक्तछंदाची बंडखोरी तालाविरुद्ध नाही, तर तालावर बद्धछंदांत जी पोलादी चौकट बसविण्यांत येते तिजविरुद्ध आहे. छंदाच्या प्रत्येक

ओळीची लांबी ठराविक असली पाहिजे, तींत तालाचां नियमित आवर्तनेंच आलीं पाहिजेत, त्यांत दोन, तीन वा चार अशा नियोजित ओळी असल्या पाहिजेत हीं छंदाचीं स्वाभाविक बंधनें नव्हत. ह्या गोष्टी म्हणजे छंदावर लादलेली पोलादी चौकट. ह्या चौकटींतून छंदास मुक्त करणें हेंच मुक्तछंदाचें उद्दिष्ट. छंदावर लादलेल्या पोलादी चौकटींतून मुक्त झालेला छंद तो मुक्तछंद.

ह्या पोलादी चौकटींतून मुक्त झाल्यामुळे मुक्तछंदास आकार राहणार नाही असें व्हावयाचें नाही. मुक्तछंदास आकार राहणारच; पण तो एखाद्या निर्जीव जड पदार्थावर बाहेरून लादलेल्या आकारासारखा राहणार नाही तर अंतर्गत आवश्यकतेने व वापरलेल्या साधनांनी, स्वभावाने बनलेला सजीव आकार राहील.

ह्या ठिकाणीं ताल म्हणजे काय हें स्पष्ट

करणेंहि योग्य होईल. छंद म्हणजे तालबद्ध अक्षर रचना असें म्हणतांना वापरलेला ताल हा शब्द इंग्रजींतील ' रिद्म् ' ह्या शब्दाच्या समानार्थी आहे. तालाचें गतिमानतेंत दृग्गोचर होणारें सहज स्वरूप तेंच येथे अभिप्रेत आहे. संगीतोपयोगी ताल वा तालप्रस्तार अभिप्रेत नाही.

मुक्तछंदांविषयी १९३१ सालीं प्रथम लिहिलेल्या 'वागीश्वरी' मासिकांतील लेखांत मी प्रत्येक नवकाव्ययुगाच्या आरंभीं एक नवा छंद कसा प्रचारांत येतो हे दर्शविलें आहे. मराठी नवकाव्याला मुक्तछंदाची आवश्यकता कां भासते हें दाखवितांना काव्याच्या प्रसाराच्या पद्धतींतला महत्वाचा फरक सांगितला होता. तो हा कीं पूर्वीं काव्याचा पठण–श्रवणाच्या योगें प्रसार होत होता. काव्याचें ग्रहण कानाच्या द्वारें होत होतें. आता काव्याचा प्रसार मुद्रणाच्या योगें होतो. काव्य डोळ्याने वाचून मनाने आकलन केलें जातें. हा फरक

क्रांतिकारक आहे व त्याने यमकाचें काव्यांतील स्थान जवळजवळ नाहींसें झालें. परंतु ह्या क्रांतिकारक फरकाकडे, किंबहुना मुक्तछंदाकडेच मराठी काव्यचिकित्सकांचें लक्ष वेधलें गेलें नाही. हिंदींत मात्र पंडित हजारीप्रसाद द्विवेदी ह्यांनी मुक्तछंदाची आवश्यकता प्रतिपादितांना ह्या फरकाला फार महत्वाचें स्थान दिलें आहे. ('कविता का भविष्य' सरस्वती मासिक-हिंदी-जानेवरी १९४० चा अंक, पृष्ठ २१) ह्या फरकामुळे छंदांतील स्वरांचें तसेंच नियमित तालावर्तनाचेंहि महत्व कमी झालें आहे. काव्य डोळ्याने वाचून मनाने आकलन करावयाचें असल्यामुळे त्यास मनांतल्या मनांत सहजपणें ज्याचा 'ग्रह' करितां येईल असा ताल हवा. ह्या डोळ्याने वाचून मनानें आकलन करण्याच्या पद्धतीला छंदाच्या चालीचा वा स्वरमेळाचा उपयोग नाही, उलट तिचा जडभार वाटतो. ह्या क्रांतिकारक फरकामुळेहि मुक्तछंदाची आवश्यकता उत्पन्न होते.

छंदासाठी काव्य नसून काव्यासाठी छंद आहे, छंद हें काव्याचें वाहन मात्र होय, ह्या गोष्टीचा पुष्कळ वेळां विसर पडतो. ज्या छंदांसाठी कवीला आपलें सहजस्फूर्त काव्य बदलावें लागतें ते छंद काव्योपयोगी नसून काव्यमारक आहेत. परंपरागत व आज प्रचलित असलेलीं वृत्तें, जाती वा अक्षरछंद हे सर्व बद्धछंद आहेत. त्यांवर जी पोलादी चौकट आहे ती अशी:—

(१) प्रत्येक चरणांत ठराविक अक्षरगण, मात्रागण, अक्षरावलि वा मात्रावलि असणें आणि त्यामुळें चरणांची लांबी ठराविक असणें.

(२) छंदात ओळींची संख्या २, ३, ४ वा अशीच ठराविक असणें.

(३) मराठी संप्रदायाप्रमाणे अंतीं यमक असणें.

आता ह्या पोलादी चौकटीच्या छंदांतून वाहतांना काव्यप्रवाहाला किती अडचण पडत असेल तें पाहूं.

यमकासारखें कृत्रिम बंधन नाही. तें स्वाभाविकपणें नादसाम्याच्या अंतर्गत प्रचीतीनें आलें तर त्याज्य नाही, पण तें जुळविण्याचा बहुशः प्रयत्न करावा लागतो. पहिल्या ओळींतील अंत्य शब्दाने वा अक्षराने दुसरी ओळ कवीच्या इच्छेविरुद्ध पूर्वनिश्चित होते. समजा, पहिल्या ओळीच्या शेवटीं ' मुळे ' हा शब्द आला . झालें ! लागलीच दुसऱ्या ओळीच्या शेवटीं ' खुळे ' ' कुळे ' असल्या शब्दांपैकी एखाद्या शब्दाची निश्चिति अपोआपच झाली. मराठी भाषेच्या अफाट शब्दभांडारांतल्या पांच पन्नास शब्दांनीच दुसऱ्या ओळींचा शेवट काबीज केला ! अर्थात् ज्यांना स्वतःचें विशेष असें कांही म्हणावयाचें नसतें अशा कवींची ह्यामुळे सोयच होते. त्यांना यमकामुळे दुसरी ओळ सुचते. म्हणजे यमक

त्यांच्या विचाराला चालना देतें. अशामुळे काव्य स्फूर्तिप्रवाही व विचारप्रवाही राहत नाही तर यमकप्रवाही व यमकप्रवाहपतित होतें. यमकामुळे कवीला जें कांही म्हणावयाचें आहे, तेंच, अगदी तेंच, म्हणतां येत नाही. यमकाला जुळेल तसा, व तशी तडजोड करीत करीत त्याला आपला काव्यपसारा पसरावा लागतो.

यमकाइतकीच अडचण वर उल्लेखिलेल्या इतर बंधनांमुळे होते. ठराविक गणांसाठी, मात्रावलीसाठी आणि अक्षरावलीसाठी कवीला शब्दांची फिरवाफिरव करावी लागते. स्वाभिप्रेत शब्द सोडून देऊन छंदास जुळते म्हणूनच कांही शब्द स्वीकारणें भाग पडतें. काय म्हणावयाचें तें संपलें तरी ओळीची ठराविक लांबी व संख्या भरली नसल्यामुळे निरर्थक शब्दयोजना करावी लागते. निरुपयोगी दर्शक सर्वनामें, निरर्थक अव्ययें आणि पोकळ विशेषणें ह्यांची बिगारभरती करावी लागते. छंदांतील

ओळींची संख्या नियमित असल्यामुळे ती भरताच पूर्णत्वाचा आभास उत्पन्न होतो. त्यामुळे विचारप्रवाह संपला नसला तरी प्रत्येक श्लोकान्तीं तो अडखळल्या-सारखा होतो ह्या सर्व अडचणींमुळे काव्य ही एक नुसती काव्यप्रवाहाची व छंदबंधनांची तडजोड होते. सारांश ह्या छंदबंधनांतून काव्य पार पाडणें म्हणजे एक विपत्तींची चढाओढच होते. अशा छंदांतील काव्य कोणतीहि एखादी संवेदना वा कल्पना कवीला कोणत्या क्रमाने प्रकट झाली हें पाहण्याच्या दृष्टीने तर अगदींच निरुपयोगी असतें; कारण त्यांत केवळ छंदसिध्यर्थ फार फेरफार झालेले असतात.

छंदावर बसविलेल्या ह्या पोलादी चौकटींतून काव्यप्रवाहाला सोडविण्यासाठी मुक्तछंद आवश्यक आहे.

तालाच्या बंधनाचा तरी स्वीकार कां करावा हा प्रश्न खरोखर निघूं शकत नाही. पण जर कोणी

काढलाच तर त्याला उत्तर असें कीं मुक्तछंद हा ‘ छंद ’ असून ‘ मुक्त ’ आहे. छंद असण्यास जी आवश्यक गोष्ट, म्हणजे ताल, ती त्यांत असलीच पाहिजे. एरव्ही तो ‘ छंद ’ राहणार नाही. ‘ काव्याला छंदाची आवश्यकता आहे काय ? ’ हा प्रश्न मात्र निघूं शकतो. काव्य हें पद्यांत तसें गद्यांतहि असूं शकतें. पण काव्याचें स्फुरण उत्कट भावनेंतून व भावनात्मक विचारांतून होत असल्या-मुळें तें स्वाभाविकपणेंच आंदोलनयुक्त व ताल-बद्ध असतें. गद्यांतील काव्यमय भाग सुद्धा आंदोलनयुक्तच असतो.

## ३. काव्याचें नवयुग कसें येईल ?

मराठी कवितेला ओहोटी लागली आहे अशी हाकाटी आजकाल करण्यांत येत आहे; पण मौलिक व उत्तम काव्य निर्माण होऊन काव्याच्या नवयुगाचा आरंभ व्हावयाला काय करावयास पाहिजे ह्याचा कवींनी वा काव्यचिकित्सकांनी विचार केलेला मात्र दिसत नाही. आज नवकाव्यविचार आणि आजच्या काळाला साजेसें नवकाव्य पाहिजे असें म्हणणारे पुष्कळ आहेत. त्यांना आजकालच्या कवितेंत प्रगति दिसत नाही, तींत नुसती भावना आहे, प्रज्ञा नाही असेंहि ते म्हणतात. पण काव्याच्या विषयांत आणि तंत्रांत नवकाळाला योग्य असे क्रांतिकारक फरक केल्याशिवाय काव्याचें नवयुग कसें येईल ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, स्थळ प्रत
सं. ८१०५ ११८८
ता. १९५०
ठाणें.

आजपर्यंत महाराष्ट्रांत उत्तम काव्य निपजत होतें, मग ह्याच कालखंडांत त्याची निर्मिति करणाऱ्या व्यक्ती एकदम कमी झाल्या आहेत कीं काय ? सृष्टीची काव्यात्मसंवेदना घेणारे कलावंतच आज नाहीत काय ? असें होणें कसें शक्य आहे ? नवकाव्यासंबंधी विचार करणाऱ्या, तें उत्तम प्रकारें निर्माण करण्याची पात्रता असणाऱ्या व्यक्ती खात्रीने आहेत, पण त्यांची काव्यनिर्मिति परंपरागत बंधनांनी कुंठित झालेली आहे.

आज कलावंतासंबंधी एकंदर कल्पनाच बदलत आहे. आजच्या कलावंताला आपल्या कलेच्या द्वारें निश्चितपणें स्वतःचें असें कांहीतरी सांगावयाचें आणि सूचित करावयाचें असतें. मग कवि हा कलावंतच मात्र छंदाशीं तडजोड करीत जशी त्या तडजोडींतून निघेल तशी रचना कशी करीत राहील ?

आता जर काव्याची प्रगति व्हावयाची असेल,

नवकाव्योदय व्हावयाचा असेल, काव्याचें नवयुग सुरूं व्हावयाचें असेल, तर काव्यास तें आज आहे त्यापेक्षा वरच्या पायरीवर नेलें पाहिजे. तें आजच्या काळाला साजेसें झालें पाहिजे. अनेक अस्वाभाविक बंधनांतून त्याची मुक्तता करून त्यांत जिवंतपणाचें, मुक्ततेचें नवचैतन्य ओतिलें पाहिजे. काव्यविषयांत आणि काव्यांतील शब्दसृष्टींत नवीन प्रयोग केले पाहिजेत. अशा नवकाव्याचें वाहन होण्यास मुक्तछंदच योग्य आहे. काव्यास ओहोटी लागली आहे, काव्याचें नवयुग सुरूं होत नाहीं, ह्याचें कारण मुक्तछंदाचा स्वीकार केला जात नाही. छंदांत ज्यांयोगें अंगचें सौंदर्य येतें ते, आंदोलन, ताल आणि अंतर्गतनादसाम्य हे, सर्वगुण मुक्तछंदांत आहेत. कृत्रिम बंधनें त्यास नाहीत. आपल्या साधेपणामुळे नवकाव्याचें वाहन होण्यास मुक्तछंदच योग्य आहे.

मुक्तछंदाचें सांगोपांग विवेचन करण्याचें हें

स्थान नाही. ज्यांना मुक्तछंदाचा अभ्यास वा चर्चा करणें असेल त्यांनी माझे ह्या विषयावरील लेख वाचावे अशी विनंती आहे. ते लेख असेः—

' मुक्तछंद ' ( वागीश्वरी, वर्ष ३, विलास १-२, १९३१ )

' मुक्तछंद : वादाचा थोडा इतिहास व विचार ' ( प्रतिभा, वर्ष २, अंक २३ व २४, १९३४. )

' मुक्तछंदाची आवश्यकता ' ( प्रतिभा, वर्ष ३ अंक २०, १९३५ )

' काव्य : परंपरा आणि प्रयोग ' ( सहविचार, वर्ष १६ अंक १, १९३७ )

## ४. आधुनिक खंडकाव्य.

आतां ह्यापुढच्या काळांत वाङ्मयक्षेत्रात कवितेला स्थान राहणार आहे काय हा प्रश्न उद्भव-लेला आहे. एक काळ असा होता कीं पद्य हेंच वाङ्मयसर्वस्व होतें, पण हळूहळू गद्याने वाङ्मया-च्या एका एका भागावर आक्रमण सुरूं करून तो प्रदेश पद्यापासून मिळविला. आता लघुकथा आणि लघुनिबंध ह्या वाङ्मयप्रकारांनी 'कथन' ह्या काव्याच्या महत्वाच्या अंगावर आक्रमण केलें आहे. त्यामुळे आता कथनपर दीर्घ काव्यास महत्वाचें स्थान राहिलें नाही.

जें गद्यांत सांगतां येणें शक्य नाही तें काव्य अशी एक काव्याची परीक्षा सांगण्यात येते. त्या दृष्टीने पाहिलें तर असा कोणता वाङ्मयप्रकार आहे कीं जो गद्यांत येऊं शकणार नाही ? मग छंदाश्रयी काव्याची आवश्यकता काय ? पुढील काळांत काव्य हा साहित्यप्रकार हळूहळू नाहीसा होत जाईल असें भविष्यहि आपण ऐकितों.

पण ही काव्याची स्थिति सांगणारे हें विसरतात कीं भावगीत हें काव्याचें अंग गद्यांत कधींहि येऊं शकणार नाही. भावगीतांत जें सांगितलें वा सुचविलें जातें तें गद्यांत कधींहि सांगता व सुचवितां येणार नाही. जोंपर्यंत साहित्य आहे तोंपर्यंत भावगीत राहणार आणि भावगीत आहे तोंपर्यंत काव्य राहणार.

तसें पाहिलें तर भावगीत हीच काव्याची मूळ प्रकृति आहे. भावगीत उत्कट भावनांचा

आंदोलनात्मक सहजोद्गार आहे. काव्याची उत्पत्ति भावगीतांत असून त्याची परिणति भावगीताच्या वृत्तींत आहे.

तेव्हा ह्यापुढे जर वाङ्मयक्षेत्रांत काव्याला आपलें स्थान टिकविणें असेल तर त्याने ह्या मूलभूत आणि चिरस्थायी अशा काव्यप्रकृतीवर, म्हणजे भावगीतावरच आपला विस्तार केला पाहिजे. पण नुसत्या भावगीतांतच काव्याचा पूर्ण विकास होऊं शकत नाही. तेव्हा भावगीताच्या वृत्तीच्या विकासांत व विस्तारांत ह्यापुढे काव्याने आपलें क्षेत्र शोधिलें पाहिजे. आधुनिक खंडकाव्य वा प्रदीर्घ काव्यरचना ही भावगीताच्या प्रस्ताराच्या स्वरूपाची असली तर ती निश्चयाने साहित्यक्षेत्रांत काव्याचें स्थान राखूं शकेल. नुसतें कथनात्मक खंडकाव्य ह्यापुढे तें स्थान टिकवूं शकणार नाही. पण भावगीताच्या वृत्तीचा विकास व विस्तार म्हणजे एखाद्या कथनात्मक घटनेवर रचिलेल्या निरनिराळ्या

भावगीतांचा संग्रह मात्र नव्हे हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. बीजाचा वृक्षांत होणारा विस्तार हा विकास. पांच दहा काव्यांचे जुडगे सूत्राने बांधिले तर तो निर्जीव संग्रह होय; जिवंत विकास नव्हे.

कथन हा काव्याचा विषय आधुनिक लघु-कथेने व्यापिल्यामुळे आता काव्यास विषयाच्या दृष्टीने क्रांतिकारक प्रयोग करणें आवश्यक झालें आहे. भावनात्मक पण जीवनोपयोगी तत्त्वज्ञान आणि जीवनाची चिकित्सा ह्या भागांत आधुनिक मराठी कविता अजूनपर्यंत म्हणावी तशी शिरलेली नाही. आधुनिक कविप्रतिभेचा प्रज्ञेशीं संयोग झालेला नाही. शास्त्रीय तत्त्वज्ञान वेगळें आणि ज्यां कांही विशिष्ट तत्त्वांमुळे मानवी जीवनाचा विकास होतो तें तत्त्वज्ञान वेगळें. विचारास भावनेचे अंकुर फोडून त्यास कार्यप्रवण करणारें असें हें जीवनो-पयोगी तत्त्वज्ञान काव्यांतून परिणामकारक रीतीने सांगतां व सुचवितां येतें.

ह्या प्रकाराने जर आता मराठी काव्याचा विकास झाला तर निश्चयाने पुन्हा काव्यास भरती येईल व त्याचें वाङ्मयांतील स्थान त्यास राखिता येईल.

## टिपणें.

परिचय :

आत्माराम रावजी देशपांडे. जन्म १९०१. 'फुलवात' ह्या नांवाचा काव्यसंग्रह १९३२ मध्ये प्रसिद्ध झाला. त्यापूर्वी 'अनिल' ह्या नांवाने नियतकालिकांतून कविता प्रसिद्ध झाल्या होत्या.

लेखनकाल :

'भग्नमूर्ति' ह्या काव्याचा लेखनारंभ तारीख ७ मे १९३५ रोजीं नागपूर येथे झाला व तें रामटेक येथे ता. २० जून १९३५ रोजीं लिहून संपूर्ण झालें.

ह्या प्रकाराने जर आता मराठी काव्याचा विकास झाला तर निश्चयाने पुन्हा काव्यास भरती येईल व त्याचें वाङ्मयांतील स्थान त्यास राखितां येईल.

## टिपणें.

परिचय :

आत्माराम रावजी देशपांडे. जन्म १९०१. 'फुलवात' ह्या नांवाचा काव्यसंग्रह १९३२ मध्ये प्रसिद्ध झाला. त्यापूर्वी 'अनिल' ह्या नांवाने नियतकालिकांतून कविता प्रसिद्ध झाल्या होत्या.

लेखनकाल :

'भग्नमूर्ति' ह्या काव्याचा लेखनारंभ तारीख ७ मे १९३५ रोजीं नागपूर येथे झाला व तें रामटेक येथे ता. २० जून १९३५ रोजीं लिहून संपूर्ण झालें.

पान १ ओळ १. भग्नमूर्ति आणि भग्नमंदिर :

ही त्रिविक्रम वामनाची मूर्ति नागपूरच्या ईशान्य दिशेस २४ मैलांवर असलेल्या रामटेक ह्या प्रसिद्ध क्षेत्रस्थलीं आहे. ‘ काशीयात्रेचें महाद्वार ’ म्हणून रामटेकची प्रसिद्धि पूर्वींपासून आहेच. महाकवि कालिदासाने मेघदूतांत उल्लेखिलेला रामगिरि म्हणजे रामटेकच असें प्राच्यविद्याविशारदांचें मत आहे. (प्रा. वा. वि. मिराशी. “ कालिदास ” पृ. ३९, १२०, १२१)

रामलक्ष्मणांचीं पुरातन देवालयें ज्या गडावर आहेत, त्याच गडाच्या वराहद्वाराच्या ईशान्य दिशेस एका उंचवट्यावर ही भग्नमूर्ति व तिचें भग्नमंदिर आहे.

मूर्ति लाल रंगाच्या पाषाणाची असून तिची उंची ५ फूट ९ इंच व रुंदी ४ फूट ८ इंच आहे.

आपल्या संस्कृतीचा लोकांस किती विसर पडला आहे ह्याची कल्पना रामटेकच्या लोकांची

ह्या मूर्तीविषयी माहिती ऐकिली म्हणजे येते. रामटेकचे लोक ह्या पडक्या देवळास ' भाऊबहिणीचें देऊळ ' म्हणतात. वामनाच्या मूर्तीस भावाची मूर्ति समजून बळीच्या मूर्तीस बहिणीची मूर्ति मानतात. वामनाच्या मूर्तीवर पावसाच्या पाण्याने जागोजाग बुरशीचे डाग उठलेले आहेत. ह्यावरून तेथील लोकांनी अशी आख्यायिका बसविली आहे कीं भावाने बहिणीस लाथ मारल्यामुळे त्याच्या अंगावर फोड आले. त्यांच्या मतें हेंच दृश्य त्या मूर्तींत दाखविलेलें आहे !

प्राच्यविद्याविशारद प. वा. डॉ. हिरालाल ह्यांनी मूर्ति वामनाची आहे व अति पुरातन आहे असें म्हटलें आहे. [नागपुर जिल्ह्याचें गॅझेटिअर १९०६ पृष्ठ ३३३.] मूर्ति निःसंदेह त्रिविक्रम वामनाची असून तिच्या शिल्पावरून ती फार पुरातन असावी असें वाटतें. हिंदुस्थानांतील वामनाच्या इतर मूर्तींशीं ( उदा. वेरूळ येथील ) तुलना केली असतां

ही मूर्ति कितीतरी पट कलापूर्ण व सुंदर आहे असें दिसेल.

ह्या मूर्तीसमोरचें सध्या भग्न असलेलें मंदिर अगदी लहानसेंच आहे परंतु आजूबाजूंच्या खुणा पाहिल्या असतां पूर्वी मोठें असावें असें वाटतें. सध्या ह्या मंदिरास सहा खांब आहेत. पण त्यांतील चार कारागिरींचे असून दोन साधे आहेत. कांही तुटलेले खांब व त्यावरील उथळ्या बाजूला रचून ठेविलेल्या आहेत.

भग्नमूर्ति व मंदिर प्राचीन स्मारक संरक्षण कायद्या-अन्वयें संरक्षिलें आहे. तसें विज्ञापन तेथे लाविलेलें आहे. पण तेवढ्याने उपद्रवी लोकांची आगळीक पूर्णपणें थांबली नाही.

पान ३, ओळ १७. कलाविध्वंसक नृशंस :

समानार्थी इंग्रजी शब्द 'व्हॅन्डल्स्'.

पान ४, ओळ ३. म्हणती आहे हा० इत्यादि :

मंदिराच्या व मूर्तीच्या रक्तपाषाणाचे उपद्रवी

लोक चोरून छिलून तुकडे कां नेतात या प्रश्नाचें उत्तर माहितगार लोकांकडून असें मिळालें.

पान ४, ओळ १५. कमलबंध :

समानार्थी इंग्रजी शब्द ' लोटस् मोटिफ् '. भारतीय स्थापत्यशास्त्रांत पद्मबंध, पंकजबंध वा कमल-बंध हेच शब्द ह्याअर्थी रूढ आहेत. ' मोटिफ् ' म्हणजे कलाकृतींतील वा कलात्मक संयोजनेंतील घटक असणारा विशेष, प्रमुख व प्रधान आशय, उद्देश वा कल्पना.

पान ९ ओळ १०. अंबाळ्यामधे :

' अंबाळा ' हें रामटेकच्या टेकडीच्या पूर्वेकडील पायथ्याशीं असलेल्या तलावाचें नांव आहे. ह्याच जला-शयांत वनवासांत असतांना सीतेने स्नान केलें अशी आख्यायिका आहे. [ ''यक्षश्चक्रे जनकतनयास्नानपु-ण्योदकेषु स्निग्धच्छायातरुषु वसतिं रामगिर्याश्रमेषु'' मेघदूत—कालिदास ] अंबराजाने ह्या पाण्यांत स्नान केलें असतां त्याचें कुष्ट गेलें. त्यामुळे त्याने हा

जलाशय बांधून काढला, म्हणून त्यास अंबालय (अंबाळें) म्हणतात, [ नागपूर जिल्ह्याचें गॅझेटिअर १९०६ पृ. २३३.] नागपूर वऱ्हाडच्या प्रदेशांतील मृतांच्या अस्थि ह्या तलावांत टाकण्यासाठी आणतात.

पान ११ ओळ १०. रामगिरीवर :

रामगिरि हें रामटेकचें पूर्वीचें नांव. उल्लेख-कालिदास-मेघदूत. प्रभावती गुप्ता हिचा वऱ्हाडांतील ऋद्धपूरचा वाकाटककालीन ताम्रपट-'रामगिरिस्वामिनः पादमूलात्.' [ भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक, वर्ष ३ अंक २-३-४ पृ. ३९].

पान ११ ओळ १६. सिंदुरागिरीभंवती :

रामटेकचें दुसरें एक नांव. उल्लेख-रामटेक येथील लक्ष्मणमंदिरांतील रामदेवराव यादवाच्या काळचा शिलालेख, [ प्रा. मिराशी व रा. ल. रा. कुळकर्णी. सरदेसाई स्मारक ग्रंथ, पृ. ११५. ]

पान ११ ओळ १७. वाकाटकांची :

वाकाटक हा राजवंश, विदर्भांत व त्यालगतच्या

प्रदेशावर सुमारें इ. स. २०० ते ५०० पर्यंत अत्यंत वैभवांत नांदला. ह्यांचे शिलालेख व ताम्रपट उपलब्ध आहेत [ जयस्वालकृत हिस्टरी ऑफ इंडिया , १५० ते ३५०; प्रा. मिराशकृत ‘ कालिदास ’. ]

पान १२ ओळ १५. राम-लक्ष्मण मंदिराची :

रामटेक गडावरील प्राचीन मुख्य मंदिरें.

पान १३ ओळ १. भोंसले महाल, बाराद्वारीच्या :

देवळाच्या परकोटाच्या आंतील इमारती. बाराद्वारीस ‘ रामझरोका ’ असें म्हणतात. तेथून चहूबाजूंचा देखावा फारच सुंदर दिसतो.

पान १५ ओळ ८. नऊ तालांची :

ताल हें शिल्पशास्त्रांतील एक लांबी रुंदीचें परिमाण आहे. बारा अंगुळें म्हणजे एक ताल. नरमूर्ति दहा तालांची, क्रूरमूर्ति बारा तालांची असुरमूर्ति सोळा तालांची, बालमूर्ति पांच तालांची

व कुमारमूर्ति सहा तालांची असावी; तसेंच, सत्ययुगांतील दहा तालांची त्रेतायुगांतील नऊ तालांची, द्वापारयुगांतील आठ तालांची व कलियुगांतील सात तालांची असावी असा शिल्पशास्त्राचा दंडक आहे. पण मूर्तिकार सामान्यतः नऊ तालांची मूर्ति करितात. ( शुक्रनीति; हिंदु व्ह्यू ऑफ आर्ट, मुल्कराज आनंद; सम् नोट्स ऑन् इंडियन आर्टिस्टिक ॲनॉटमी, अवनींद्रनाथ टागोर. )

पान १५ ओळ १५. अतिभंगांत :

हिंदु शिल्पशास्त्रांत मूर्तींचे ठाणमाणावरून चार प्रकार सांगितले आहेत ते असेः—

(१) समभंग : सर्वबाजूंना सारखा तोल असणें. सात्विक व ध्यानस्थ मूर्तींसाठी. (२) अभंग : एका पायावर किंचित भार देउन ध्यानस्थ उभें असणें. ध्यानस्थ मूर्तींसाठी. (३) अतिभंग : जोराच्या वाऱ्याने जसा वृक्ष वांकतो त्याप्रमाणे भावनाभराने फार वाकून उभें असणें. प्रहरण वा संहारासारख्या

कृती करणाऱ्या मूर्तींसाठीं. (४) त्रिभंग : अतिभंगाचा एक प्रकार. तीन ठिकाणीं वाकलेल्या मूर्तींसाठी. [ ग्रंथ—वर उल्लेखिलेले ].

पान १६ ओळ २. उरुमाळ :

दोन्ही दंडांस बांधून मांड्यांपर्यंत पोंचणारी माळ.

पान १६ ओळ १३. दानशूर आणि महाबली :

' येन बद्धो बली राजा दानशूरो महाबली ' रक्षा-बंधन मंत्र.

पान १७ ओळ १. प्रभामंडळ :

मूर्तींच्या मुखाभोंवतींचे किरणांनी दाखविलेलें तेजाचें वर्तुळ.

पान १७ ओळ १०. अद्भुत वामन :

श्रीजयदेव कवीने गीतगोविंदांत वामनावताराचें वर्णन असें केलें आहे—

' छलयसि विक्रमणे बलिमद्भुतवामन

पदनखनीरजनितजनपावन

केशव धृतवामनरूप
जय जगदीश हरे । '

पान १७ ओळ १३. रेषासंगति :
समानार्थी इंग्रजी शब्द ' हार्मनी ऑफ लाइन्स्.'

पान २० ओळ १४. अनाहतनाद :
प्रहरणाशिवाय उत्पन्न झालेला आवाज.

पान २९ ओळ २. संग्रहालयें :
इंग्रजी समानार्थी शब्द ' म्यूझियम् '

पान २९ ओळ ७. मथुरेच्या आर्षसंग्रहालयीं :
मथुरेचें कर्झन म्यूझियम् ऑफ आर्किऑलजी.

पान ३४ ओळ ९. कालिदासहि :
महाकवि कालिदास हा रामटेक येथे आला असावा ह्यासंबंधी प्रा. मिराशीकृत कालिदास पृ. ३९ पाहा.

पान ३५ ओळ ५. वाहिली ज्याची फुलें यक्षानें :
स प्रत्यग्रैः कुटजकुसुमैः कल्पितार्घाय तस्मै.
— मेघदूत. ४

पान ३६ ओळ २. रामगिरीची पाहा ह्या होते :

ह्यासंबंधी प्रा. मिराशीकृत ' कालिदास ' पृ. ९ पाहा.

पान ३६ ओळ ४. द्वितीय प्रवरसेन :

वाकाटक नृप. चंद्रगुप्त विक्रमादित्याचा नातू ( दौहित्र ).

पान ३६ ओळ ५. प्रभावती गुप्ता :

चद्रंगुप्त विक्रमादित्याची मुलगी. हिचा विवाह वाकाटकनृप द्वितीय रुद्रसेनाशीं झाला. ( इ. स. ३९५ चा सुमार. ) रुद्रसेनाच्या मृत्यूनंतर द्वितीय प्रवरसेन लहान असल्यामुळे ही राज्यकारभार पाहात होती.

पान ३६ ओळ ६. रामगिरिस्वामी :

प्रभावती गुप्ता हिच्या ऋद्धपूरच्या ताम्रपटांत उल्लेख. ' रामगिरिस्वामिनः पादमूलात् ' [ भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक वर्ष ३, अंक २,

३, ४, पृ. ९३.] हा ताम्रपट कार्तिक शुद्ध द्वादशीला रामगिरीवर प्रभु रामचंद्राच्या पादकमलाजवळ एका ब्राम्हणास दिला आहे.

पान ३६ ओळ १०. नंदपूर :

रामटेक तालुक्यांतील जंगलांत असलेले. पेंच नदीकाठचें एक गांव येथील अवशेषां-संबंधी व हें नंदपूर वाकाटकांची राजधानी असावी ह्या संबंधी रा. टि. ए. वेलस्टेड ह्यांचा 'नोटस् ऑन वाकाटकाज ऑफ दि सी. पी. अँड बरार अँड देअर कंट्री : फोर्थ टु सिक्स्थ सेंचरी ए. डी.' हा जर्नल अँड प्रोसिडिंग्ज ऑफ एशियाटिक सोसायटी ऑफ बंगाल, न्यु सिरीज व्हॉ. २९-१९३३ नं. १ मधील लेख पाहा.

पान ३७ ओळ ७. अभेद्य दुर्ग :

नंदपूरच्या दोन्हीबाजूस मित्रगड व घुघुसगड ह्या नांवाचे दोन डोंगरी किल्ले आहेत.

पान ३९ ओळ ७. तत्त्वज्ञानाने :

हा शब्द शास्त्रीय तत्त्वज्ञान ह्या संकुचित अर्थाने येथे व पुढे वापरलेला नाही. व्यापक व सामान्य अर्थाने वापरलेला आहे.

पान ३९ ओळ १२. स्वरक्षणाचें :

इंग्रजी समानार्थी शब्द 'सेल्फ प्रिझर्व्हेशन्'.

पान ४० ओळ ५. दैनासुर :

इंग्रजी समानार्थी शब्दः—

दैनासुर — डायनासार
भ्रांतासुर — ब्रॉंटॉसॉरस्
प्लीजासुर — प्लेझिऑसॉरस्
अस्थ्यासुर — इस्थिऑसॉरस्
द्विप्लत्रोदक — डिप्लोडोकस्
मत्तदंत — मॅस्टॅडॉन्
मम्मथ — मॅमथ्

लाखों वर्षांपूर्वी हे प्रचंड प्राणी भूतलावर नांदून गेले. आज अश्मीभूत सांगाडे उपलब्ध होतात.

पान ४२ ओळ ११. जीवद्रव :

'प्रोटोप्लाझम्' (आजरेकरकृत वनस्पतिजीवन ह्या ग्रंथांत वापरलेली परिभाषा).

पान ६५ ओळ ९. हजारों यात्रिक :

रामटेक येथे त्रिपुरीपौर्णिमेला फार मोठी यात्रा भरत असते.

पान ६७ ओळ १२. त्रिपुर जळे :

त्रिपुरी पौर्णिमेला रामटेक येथे मध्यरात्रीं आरतीच्या वेळीं त्रिपुर जाळतात. एक पीतांबर तुपांत भिजवून देवळाच्या उंच कळसाजवळ मुद्दाम केलेल्या जागेवर एका मोठ्या आरतीपात्रांत ठेवितात आणि आरतीच्या वेळीं तो पेटवितात. त्यास त्रिपुर म्हणतात. जनभाषेंत त्रिपुरास 'टिपूर' म्हणतात.

पान ७० ओळ ९. कैलासमंदिर :

वेरूळचें कैलासमंदिर.

पान ७३ ओळ २. विनाशी :

विनाश करणारीं, बिघडविणारीं.

ठाणे.
क्र. ५८१ ता. १७।१।६०

पान ८३ ओळ १. मुक्तछंद :

इंग्रजी समानार्थी शब्द 'फ्री व्हर्स', फ्रेंच 'व्हेर् लिब्र'.

पान ८४ ओळ २. चरणक :

इंग्रजी समानार्थी शब्द 'फूट'. चरण म्हणजे ओळ व चरणक म्हणजे ज्यायोगें ओळ तयार होते असा घटक.

पान ८४ ओळ ८. स्तंभ :

इंग्रजी समानार्थी शब्द 'स्टॅन्झा'.

पान ८४ ओळ ९. छेदन :

इंग्रजी समानार्थी शब्द 'स्कॅन्शन्'.

पान ८७ ओळ १. आंदोलन :

इंग्रजी समानार्थी शब्द 'केडन्स'.

पान ९४ ओळ ७. विपत्तींची चढाओढ :

इंग्रजी समानार्थी शब्द 'ऑब्स्टॅकल रेस'.

पान ९८ ओळ १३. अंतर्गत नादसाम्य :

इंग्रजी समानार्थी शब्द 'इंटर्नल् ॲसोनन्स्'.

१०४२

## आभार

ह्या काव्यांतील चित्रें रा. केशव रघुनाथ देशपांडे, जोगेश्वरी, पुणें ह्यांनी फार परिश्रमपूर्वक तयार केलीं आहेत. ह्या तरुण कलावंताचे आभार मानावे तितके थोडे.

बांधणीवरील अक्षरें व बांधणीच्या आंतील पृष्ठाच्या संयोजनेचा 'लिनोलियम ब्लॉक' विनायक कमलाकर व प्रभाकर ह्या प्रयागी बंधूंनी माझ्या कल्पनेप्रमाणे तयार करून दिला. 'लाईन ब्लॉक्स' वागळे प्रोसेस, मुंबई ह्यांनी तयार केले आहेत.

मुद्रितें वाचण्यांत रा. नारायण मार्तंड बक्षी ह्यांनी साहाय्य केलें. मुद्रण आदर्श करण्यांत रा. नारायण लक्ष्मण प्रयागी आणि विनायक विष्णु प्रयागी ह्यांनी फार परिश्रम घेतले.

ह्या सर्वांचा मी फार आभारी आहें.

८८, पश्चिम उद्यान मार्ग
धनतोली, नागपूर } आ. रा. दे.



REFBK-0006042
REFBK-0006042